# पुनर्भेट

पाव शतकाने ठरे भेट शाळासोबत्यांची
आठवणींनी दंगल केली खोखो खेळण्याची
काही मोहरे सोज्वळ, काही चेहरे खट्याळ,
मिसरूड फुटूनही कोवळे नि लडिवाळ
त्यांत गुंगोनियां हरे भान पाव शतकाचें
हुडकीत गेलों दार भूतकाळींच्या वर्गाचें॥ १॥
भेटण्याच्या जागीं जातां गेलों पुरा चक्रावून
ओळखीचें सापडेना तेथे कोणीही शोधून
सारे चाळीशीचे प्रौढ, सुखवस्तू, यशवंत
डोळ्यांवर चष्मा कोणा, कोणा टक्कल किंचीत
“हा असा मी, भाग्यवंत, माझी घसट थोरांशी,”
छाप पाडण्यास सारे अवघडले स्वतांशीं॥ २॥
पार्टीमध्ये आला पूर मग द्राक्षाच्या अर्काचा
गेलें ‘मी’पण वाहून लागे सूर एकेकाचा
लख्ख ओळख पटली, मुखवटे हरवले
बाळमैत्रीच्या नशेने सोवळेही भारावले
धुंद मैफलीस चढे रंग मधल्या सुट्टीचा
खोड्या, थट्टा, झटापटी, घट्ट जिव्हाळा गट्टीचा
उच्च-नीच भेदभाव - त्याची नजर ना लागे
जुन्या समान साथीचा स्नेह मनोमनीं जागे॥ ३॥
चार तास अशी शाळा, दोन घडी बालपण
क्षण वियोगाचा येतां दाटे कंठांमध्ये आण,
‘फिरूनियां प्रयत्नाने एकमेकां गाठायाचें,
आयुष्यात वारंवार मैत्रवाण लुटायाचें,
बनूनियां एकनाळ काही काळ जगायाचें,
नातें किशोरवयींचे प्रौढपणीं जपायाचे,
नका गुंगारा देऊ रे, साऱ्यासाऱ्यांनीं यायचें,
बाळपणाची शप्पथ, पुन्हां नक्की भेटायाचें’ ॥४॥

-डॉ. उज्ज्वला दळवी
२ सप्टेंबर २००९